मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेत नवीन पदाधिकारी अवघ्या चार महिन्यांत मिळणार

## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पन्नास टक्के आरक्षण; महिला सदस्यांची संख्याही वाढणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत लोकनियुक्त सदस्यांची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली. त्यानंतर निवडणुका कधी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी निवडणूका घ्या असे आदेश दिले आहेत. त्यानुसार चार महिन्यांत महापालिकेत नवीन पदाधिकारी मिळणार आहेत. या मध्ये आरक्षणानुसार पन्नास टक्के महिला असतील. शिवाय, खुल्या पन्नास टक्के जागांवरही महिलांना निवडणूक लढविता येणार आहे. त्या जागांवर विजयी झालेल्या महिलांमुळे सभागृहातील त्यांची संख्या वाढणार आहे.




स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पन्नास टक्के आरक्षण आहे. शिवाय, आरक्षित संवर्गासह अन्य खुल्या जागांवरही महिला निवडणूक लढवू शकतात. पिंपरी चिंचवड महापालिकेतील लोकनियुक्त सदस्यांची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली आहे. तेव्हापासून प्रशासक म्हणून आयुक्त कारभार पहात आहेत. हा कालावधी साडेतीन वर्षांपेक्षा अधिक झाला आहे. त्यामुळे निवडणूक लढविण्यासाठी प्रत्येक पक्षातील इच्छुकांची संख्याही वाढली आहे. त्यात अनुभवी माजी महिला सदस्यांसह नव्याने राजकारणात आलेल्या युवतींची संख्या अधिक असल्याचे विविध पक्ष, त्यांच्या सेलच्या बैठकींतील उपस्थितीवरून दिसते. आंदोलने, समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडे जाणारी शिष्टमंडळे यात महिलांची संख्या लक्षणीय असते. त्यामुळे नेतृत्वाच्या लढाईत जिंकण्यासाठी महापालिका निवडणूक लढविण्याच्या लढाईतही त्या उतरू शकतात, असे शहरातील चित्र आहे.

### महिलांच्या संख्याबळाचे गणित

- » एकूण जागा : १२८
- » ५० टक्के आरक्षण : ६४
- » राखीव संवर्गासह संख्याबळ
- » संवर्ग / एकूण संख्या / महिला आरक्षण / खुला
- » अनुसूचित जाती (एससी) /२० / १० / १०
- » अनुसूचित जमाती (एसटी) / ३ / २ / १
- » नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) / ३५ / १८ / १७
- » सर्वसाधारण (खुला) / ७० / ३४ / ३६

**यापूर्वीची स्थिती**

२०१२ ते २०१७ : महापालिकेच्या १२८ जागांसाठी द्विसदस्यीय पद्धतीने निवडणूक झाली होती. त्यात ६४ ऐवजी ६६ महिला निवडून आल्या होत्या. प्रभाग ११ आणि प्रभाग २६ मधील दोनही सदस्य महिला होत्या.

२०१७ ते २०२२ : महापालिकेच्या १२८ जागांसाठी चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक झाली होती. त्यात ६४ महिला निवडून आल्या होत्या.

**संभाव्य निवडणूक**

२०२६ ते २०३१ : महापालिकेच्या १२८ जागा असून, चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक होणार आहे. प्रत्येक संवर्गातील खुल्या जागांसह सर्वसाधारण प्रवर्गातूनही महिला निवडणूक लढवू शकतात. त्यांवर विजय मिळवल्यास नव्या सभागृहात महिलांची संख्या वाढू शकेल.

# गरबा व दांडिया प्रशिक्षणास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जितेंद्र यादव व शितल यादव यांनी पुढाकार घेऊन प्रशिक्षण शिबिर राबविले

**पिंपरी | प्रतिनीधी**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून चिखली परिसरातील महिला व लहान मुलांना गरबा व दांडिया खेळता यावे, यासाठी जितेंद्र यादव व शितल यादव यांनी पुढाकार घेऊन प्रशिक्षण शिबिर राबविले. या शिबिरास परिसरातील महिला-मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



चिखली परिसरातील संस्कृती सोसा, विस्टेरिया, पार्श्व प्लॅटीनम यासह इतर सोसायटीमध्ये गरबा व दांडिया प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. गरबा कशा पध्दतीने खेळावा, त्याच्या स्टेप कशा, पेहराव कसा याबद्दलची माहिती त्यामध्ये देण्यात आली.

> “ नवरात्रोत्सवामध्ये स्त्री-शक्तीचा जागर केला जातो. चैतन्यमय वातावरण या नऊ दिवसामध्ये असते. अनेक महिलांना गरबा, दांडिया खेळण्याची इच्छा होते. मात्र त्याबद्दची माहिती किंवा त्याच्या स्टेप कशा आहेत हे माहित नसते. नवरात्रोत्सवाचे अनेक ठिकाणी मोठ-मोठे उपक्रम होतात. मात्र महिलांना व्यवस्थित गरबा, दांडियाचे प्रशिक्षण दिले की, त्यांचा आनंद द्विगुणीत होतो. त्यामुळे परिसरातील माझ्या महिला भगिनींसाठी हे प्रशिक्षण शिबिर घेतले.
>
> - शितल यादव
> (सामाजिक कार्यकर्त्या)

# साने चौक ते चिखली रस्ता रुंदीकरण कधी; नागरिकांचा सवाल

## अतिक्रमण काढायला घाई केली तशीच घाई रस्ता रुंदीकरणासाठी करा; नागरिकांचा सवाल

**पिंपरी |मनीषा थोरात-पिसाळ**

चिखली-आकुर्डी रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी साने चौक ते चिखली गाव डीपी रस्त्याच्या रूंदीकरणाचा प्रस्ताव आहे. त्यासाठी काही महिन्यांपूर्वी रस्ता अतिक्रमणमुक्त कऱ्ण्यात आला. हा डीपी रस्ता पहिल्या टप्प्यात साने चौक ते पिंगळे रोड चोवीस मीटरनुसार विकसित केला जाणार आहे. मात्र अजूनही जागा कागदोपत्री ताब्यात नसल्यामुळे रस्ता रूंदीकरणाचे काम रखडलेले आहे. अतिक्रमण काढायला घाई केली तशीच घाई रस्ता रूंदीकरणासाठी करा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



चिखलीगाव ते साने चौक रस्त्याचा विकास तीन टप्प्यात होणार आहे. त्यामध्ये बारा, अठरा अन् चोवीस असा विकसित होणार आहे. पहिला टप्पा नगररचनेच्या डीपीनुसार हा ३० मीटरचा आहे. मात्र चोवीस मीटरनुसार काही जागा हस्तांतरित झाल्या आहेत. तसेच नागरिक, व्यापाऱ्यांचीही मागणी चोवीस मीटरनुसार आहे. त्यामुळे साने चौक ते राधास्वामी सत्संग कॉर्नरपर्यंत हा रस्ता पहिल्या टप्प्यात चोवीस मीटरनुसार विकसित केला जाणार आहे. यामध्ये काही जागा मालकांनी प्रपत्र अ आणि ब द्वारे जागा हस्तांतरीत केल्या आहेत. तर काही जागा कागदोपत्री ताब्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रूंदीकरणाचे काम रखडलेले आहे.

विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या प्रक्रिया सुरु आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची जागा पूर्ण ताब्यात येईल. तसेच शासनाकडे तीस मीटर डीपी रस्ता चोवीस करावा यासाठीचा प्रस्ताव पाठविला आहे. अद्याप या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

> महापालिकेच्या वतीने २१ जुलै रोजी जागामालकांसाठी शिबिर घेण्यात आले होते. त्यानुसार मळेकर कुटूंबियांकडून प्रपत्र अ आणि ब द्वारे नगररचनाकडे जागा हस्तातंरित केली आहे. इतर जागा मालकांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यावेळी करण्यात आले होते. मात्र त्यावेळी अत्यल्प प्रतिसाद मिळाला होता. रस्ता रूंदीकरण झाल्यास वाहतूक कोंडी रोखण्यास मदत होईल, आपल्या परिसराचा विकास होणार त्यामुळे पुढाकार घेतला.
>
> **- गणेश मळेकर (स्थानिक)**

> साने चौक ते चिखली रस्ता रूंदीकरणासाठी चोवीस मीटर नुसार जागा हस्तांतरित कऱ्ण्यासाठी व्यापाऱ्यांना, जागा मालकांना काहीही हरकत नाही. आजही चोवीस मीटर नुसार कागदोपत्री जागा हस्तांतरीत करण्यासाठी सर्वांचा होकार आहे. वाहतूक कोंडी टाळून सुसज्ज रस्ता हा मुख्य उद्देश आहे. हा रस्ता झाल्यास आजुबाजूच्या नागरिकांसह सोसायटीधारकांनाही दिलासा मिळेल.
>
> **- यश साने (स्थानिक)**

> जागा मालकांनी डीपीरस्त्यासंदर्भातील जागा प्रपत्र अ आणि ब द्वारे नगररचना विभागाला हस्तातंरित केल्यास निविदा प्रक्रियेचे काम पूर्ण केले जाईल. निविदा प्रक्रियेचे काम सुरु आहे.
>
> **- शिवाजी चौरे,**
> **फ प्रभाग स्थापत्य विभाग.**

# पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मोशीत स्वच्छता अभियान

## मोशी परिसरात शिवयोध्दा ग्रुप चे अध्यक्ष गणेश सस्ते यांच्या पुढाकारातून स्वच्छता अभियान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरपासून देशभर स्वच्छता अभियान व सेवा सप्ताह राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर मोशी परिसरात शिवयोध्दा ग्रुप चे अध्यक्ष गणेश सस्ते यांच्या पुढाकारातून स्वच्छता अभियानासह सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान तसेच विविध उपक्रम परिसरात घेण्यात आले.






स्वच्छता अभियान शिबिरामध्ये मोशी परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या वंदना आल्हाट, राजेश सस्ते, अर्चना सस्ते यांच्यासह मित्रपरिवार, मोशी परिसरातील नागरिक सहभागी झाले होते. परिसराला स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचे आभार मानले.

महापालिकेच्या मोशी कन्या शाळेतील विद्यार्थीनीना स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यातील विजेत्या विद्यार्थीनींना बक्षीस देऊन प्रोत्साहानाची थाप देण्यात आली.

> देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सुशासन पंधरवडा निमित्त स्वच्छता अभियान घेण्यात आले. यामध्ये परिसर स्वच्छतेसह आपला परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले. त्यांचे परिसराठी मोलाचे योगदान आहे.
>
> **- गणेश सस्ते ( अध्यक्ष शिवयोध्दा ग्रुप)**

# हिंजवडी- शिवाजीनगर मेट्रोचे पुणेकरांना दिवाळी गिफ्ट!

## मेट्रोचे काम वेगाने सुरू; मार्गिकेवरील मेट्रो सेवा पुढील वर्षी मार्चपासून सुरू करण्याचे नियोजन

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. या मार्गिकेवरील मेट्रो सेवा पुढील वर्षी मार्चपासून सुरु करण्याचे नियोजन आहे. या मार्गिकेचे काम सुमारे ९० टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे हिंजवडीपासून बाणेरदरम्यान या मेट्रोची सेवा सुरू करून पुणेकरांना दिवाळी भेट द्यावी, अशी मागणी आयटी कर्मचाऱ्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) केली आहे. त्यामुळे दिवाळीत या मार्गावर मेट्रो धावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



फोरम फॉर आयटी एम्प्लॉईजने ही मागणी केली आहे. आयटी फोरमने म्हटले आहे की, बाणेर परिसरात मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या आहेत. या ठिकाणी एक ते दोन किलोमीटरच्या परिघात दीड ते दोन लाख आयटी कर्मचारी कार्यरत आहेत. बाणेर आणि बालेवाडी भागात मोठ्या प्रमाणात निवासी संकुले असून, मोठ्या संख्येने आयटी कर्मचारी या परिसरात वास्तव्यास आहेत. बाणेरमधून दररोज हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये आयटी कर्मचाऱ्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या ठिकाणी रस्त्यांची स्थिती खराब असल्याने तासनतास वाहतूक कोंडी असते.

आयटी कर्मचाऱ्यांची प्रवासाची समस्या सोडविण्यासाठी टप्प्याटप्प्याने मेट्रो सेवा सुरू करावी. पहिल्या टप्प्यात हिंजवडी ते बाणेर या टप्प्यात मेट्रो सेवा सुरू करावी. यामुळे हिंजवडी ते बाणेर हा आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवास अधिक सुकर होऊन या भागातील वाहतूक कोंडीही कमी होईल. वाहतूक कोंडीतून सुटका करण्याची मागणी आयटी कर्मचारी सातत्याने करीत आहेत. मुख्यमंत्र्यांसह इतर मंत्र्यांनीही या प्रकरणी कोंडी सोडविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे मेट्रो सेवा टप्प्याटप्प्याने सुरू केल्यास आयटी कर्मचाऱ्यांसह सर्वच नागरिकांना दिलासा मिळेल. हे आयटी कर्मचाऱ्यांसाठी दिवाळी अथवा नाताळची भेट ठरेल, असेही फोरमने स्पष्ट केले आहे.

**मेट्रोचे ९० टक्के काम पूर्ण**

हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो मार्गाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. माण डेपो ते पीएमआर-४ स्टेशन दरम्यान पहिली चाचणी जुलै महिन्यात यशस्वीरीत्या पार पडली आहे. या मार्गावर एकूण २३ स्थानके असणार असून शहरातून हिंजवडीला कामासाठी जाणाऱ्या नागरिकांचा मौल्यवान वेळ वाचणार आहे. हा मार्ग भारतातील पहिला सार्वजनिक-खाजगी भागीदारीत ( पीपीपी) उभारला जाणारा मेट्रो प्रकल्प आहे. टाटा व सिमेन्स या कंपन्यांच्या संयुक्त उपक्रमातून पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडच्या नावाने प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाचे काम २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सुरू झाले होते. आतापर्यंत प्रकल्पासाठी चार मेट्रो रेलगाड्या उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्येक गाडीत सुमारे एक हजार प्रवासी प्रवास करू शकणार असून ८० किमी प्रतितास या वेगाने गाड्या धावणार आहेत.

### बालेवाडीपर्यंत चाचणी पूर्ण

» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाची पहिली चाचणी जुलैमध्ये यशस्वीपणे पार पडली होती. गणेशचतुर्थीच्या मुहूर्तावर पुणेरी मेट्रो प्रथमच हिंजवडीतून बाहेर पडली होती. त्यावेळी हिंजवडी शिवाजीनगर मेट्रोची माण डेपोपासून ते बालेवाडी स्टेडियम येथील स्टेशन क्रमांक १० पर्यंत चाचणी यशस्वीपणे पार पडली होती. या मेट्रो मार्गाचे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची अंतिम मुदत ठरविण्यात आली आहे. सुरुवातीला जमीन भूसंपादनातील अडथळे आणि तांत्रिक कारणांमुळे काम पुढे ढकलले गेले होते. तब्बल २३.३ किमी लांबीच्या या मार्गामुळे दररोज वाढत जाणाऱ्या वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे.

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिकेने घेतला मोठा निर्णय!

## शहरातील रस्त्यांवर, चौकांमध्ये होत असलेल्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवर, चौकांमध्ये होत असलेल्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी पुढाकार घेतला आहे. 'ज्या ३२ रस्त्यांवर आणि चौकांमध्ये वाहतुकीची सतत कोंडी होते, अशा २२ ठिकाणांची पाहणी करून त्याचा अहवाल सोमवारपर्यंत द्यावा,' अशा सूचना आयुक्त नवल किशोर राम यांनी दिल्या आहेत.



शहरात होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांसह वाहनचालक त्रस्त झाले आहेत. शहराच्या एका भागातून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी मोठा वेळ लागतो. शहरात अनेक रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागतात. यामधून नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी आयुक्त राम यांनी लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. शहरातील प्रमुख ३२ रस्ते आणि वाहतूक कोंडी होणाऱ्या २२ ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून तेथे नक्की कोंडी का होते, याचा सविस्तर अहवाल देण्याचे आदेश आयुक्तांनी पथ विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

वाहतूक कोंडीत पुणे शहराचा जगात पहिल्या १० शहरांमध्ये क्रमांक लागतो. यामुळे अनेक परदेशी कंपन्या पुण्याबाहेर जाण्याच्या प्रयत्नात आहेत. हिंजवडी येथे जाण्यासाठी आयटी कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तासनतास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. वाहतुकीचा कमी झालेला वेग वाढविण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून महापालिका, वाहतूक पोलिसांनी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र, अजूनही ही समस्या कायम आहे. त्यामुळे एक पाऊल पुढे टाकून पथ विभागातील अधिकाऱ्यांची आयुक्तांनी बैठक घेतली. तसेच, या ठिकाणांची पाहणी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

रस्त्यावर पडलेले खड्डे दुरुस्त करताना महापालिका अनेकदा चुकीच्या पद्धतीने खड्डे बुजविते त्यामुळे काम केल्यानंतरदेखील अनेकदा रस्त्यांवर खड्डे कायम राहतात. त्यामुळेही वाहतुकीचा वेग कमी होत असल्याचे समोर आले आहे. तर, काही ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिक्रमणांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. त्याचाही परिणाम वाहतुकीच्या वेगावर होतो. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी कोंडीची कारणे शोधण्यास सांगितली आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होते. गेल्या तीन-चार दिवसांपासून शहरात पडत असलेल्या पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साठवून राहत असून त्याचा निचरा होण्यासाठी विलंब होत असल्याचे समोर आले आहे. साठलेल्या पाण्यातून वाहने चालवताना वाहन चालकांचे तसेच रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांची तारांबळ उडते. आयुक्तांनी दिलेल्या आदेशांमुळे तयार केल्या जाणाऱ्या अहवालामध्ये याचा उल्लेख करण्यात येणार की नाही, हे अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

### हे अधिकारी करणार पाहणी

» या पाहणीमध्ये पथ विभाग, बांधकाम विभाग, क्षेत्रीय कार्यालय, परिमंडळ कार्यालय, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग, आकाशचिन्ह या विभागांमधील अधिकारी, अभियंत्यांचा समावेश आहे. हे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन ही पाहणी करणार आहेत. त्याचा अहवाल सोमवारपर्यंत सादर करण्यास सांगितले आहे.

# पुरंदर विमानतळाचे टेकऑफ!

## विमानतळासाठी ९१ टक्के शेतकऱ्यांची भूसंपादनाला संमती; जागा ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील ९१ टक्के शेतकऱ्यांनी भूसंपादनाला संमती दिली आहे. एकूण २ हजार ८०० शेतकऱ्यांनी २ हजार ७०० एकर जागा देण्याबाबतची संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाकडे दिली आहेत. त्यामुळे ही जागा ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे सरकारने साडेसात हजारांऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. तसेच, विमानतळासाठीच्या भूसंपादनाची प्रक्रिया २५ ऑगस्टपासून सुरू केली. जागा देण्यासाठी शेतकऱ्यांना १८ सप्टेंबरपर्यंत संमतिपत्रे देण्याची मुदत देण्यात आली होती. ही मुदत गुरुवारी संपुष्टात आली.



या मुदतीमध्ये पुरंदर विमानतळासाठी आतापर्यंत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना दिली. संयुक्त मोजणीनंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना एकरकमी मोबदला देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष जमिनीचे संपादन करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### सहमतीने जमीन देणाऱ्यांस लाभ काय?

» पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सहमतीने जमिनी देणाऱ्यांना 'प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर 'एरोसिटी'त एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी विमानतळाच्या परिसरात सुमारे सातशे एकर जागा राखीव ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार विमानतळासाठी सहमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना त्या मोबदल्यापोटी एकूण जमिनीच्या दहा टक्के विकसित भूखंड आणि बाजारभावाच्या चार पट दराने मोबदला देण्यात येणार आहे.

### दोन धावपट्ट्यांचे नियोजन

» पुरंदर विमानतळासाठी दोनच धावपट्ट्या करण्याचे नियोजन आहे. तसेच, विमानतळासाठी सुमारे २ हजार २०० एकर एवढे क्षेत्र असून, त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे दोनशे एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे भूसंपादन केलेल्या जमिनीसह विमानतळासाठी सुमारे २९०० एकर जमीन उपलब्ध होणार आहे. दरम्यान, संमतिपत्रे देण्याची मुदत वाढविण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# 42 हजार पाणी मीटर गोदामात पडून

## नागरिकांच्या विरोधामुळे समान पाणीपुरवठा योजनेला विलंब; राजकीय पक्षांची बघ्याची भूमिका

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील प्रत्येक भागातील नागरिकांना समान पाणीपुरवठा व्हावा आणि गळती रोखण्यासाठी महापालिकेने २०१५ मध्ये मंजुरी दिलेल्या समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाणी मीटर बसविण्यास नागरिकांकडून विरोध होत असल्याने या योजनेला विलंब झाल्याचे निदर्शनास आले आहे. या योजनेनुसार दोन लाख ३२ हजार ६५२ पाणी मीटर बसविण्याचे उद्दिष्ट असताना अद्यापही ४२ हजार मीटर गोदामामध्ये शिल्लक असल्याने महापालिका प्रशासन हवालदिल झाले आहे. निवडणूक जवळ आल्याने राजकीय पक्ष हे बघ्याच्या भूमिकेत असल्याने प्रशासनापुढे प्रश्न निर्माण झाला आहे.

पाणी वितरण व्यवस्थेमध्ये असणारी ४० टक्के गळती थांबवण्याबरोबरच प्रत्येक भागातील नागरिकांना समान आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना हाती घेतली आहे. पुढील ३० वर्षांचा विचार करून आणि शहराची पुढील काही वर्षांतील वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेला महापालिकेच्या मुख्य सभेने मे २०१५ मध्ये मंजुरी दिली आहे. मात्र अद्यापपर्यंत ही योजना पूर्णत्वास गेलेली नाही.

या योजनेच्या माध्यमातून मीटर बसविले जाणार आहेत. जे नागरिक जादा पाणी घेतील, त्यांच्याकडून अधिक बिल आकारले जाणार आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीला ठरावीक लिटर पाणी दिले जाणार आहे. मीटर बसविण्यासाठी नागरिकांचा



विरोध होत असल्याने या योजनेचे काम थांबले आहे. त्यावर मीटर बसविण्यासाठी विरोध करणाऱ्या नागरिकांच्या विरोधात थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा इशारा महापालिकेने महिना-दीड महिन्यापूर्वी दिला होता. मात्र, त्यानंतरही या योजनेच्या कामाला गती मिळाली नसल्याचे समोर आले आहे. अद्याप ४२ हजार मीटर बसविणे शिल्लक असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

समान पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी शहरात विविध भागांमध्ये पाणी साठविण्यासाठी ७९ टाक्या बांधण्यात आल्या आहेत. पाणी वितरणासाठी १ हजार २६८ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या, १०१ किलोमीटर लांबीच्या पाणी साठवण टाक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या आणि २ लाख ३२ हजार ६५२ पाणी मीटर बसवणे, ७ नागरी सुविधा केंद्र आणि ६ नवीन पंपिंग स्टेशन ही कामे केली जाणार आहेत. हे काम ३६ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे निविदेमध्ये नमूद करण्यात आले होते. मात्र, या कामाला आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे.

पाण्याचे मीटर बसविण्यासाठी नागरिकांचा विरोध आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत योजना राबविण्यासाठी मंजुरी दिलेले लोकप्रतिनिधीदेखील मीटर बसविण्यासाठी कोणतेही प्रयत्न करत नसल्याने अडचणी वाढत आहेत. मीटर बसवून घ्यावेत, यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत.

मात्र त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या दीड महिन्यामध्ये महापालिकेने ३६ हजार मीटर बसविले असून, अद्यापही ४२ हजार मीटर बसविण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. त्यातच आता महापालिकेची निवडणूक होणार असल्याने राजकीय पक्षांकडूनही याकडे लक्ष देण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे उर्वरित मीटर बसविण्यासाठी अजून किती काळ लागणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

### मीटर बसविण्यास विरोध

शहरातील मध्य वस्तीचा भाग असलेल्या कसब्यासह पेठांचा भाग, कोथरूड, कात्रज, धनकवडी, येरवडा, ससाणेनगर, येरवडा, कोंढवा, मोहम्मदवाडी, मार्केटयार्ड येथून मीटर बसविण्यासाठी विरोध होत असल्याचे समोर आले आहे.